# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.६४/२०१९ मधील
# निशाणी क्र.२२ वर आदेश

**CNRNO.MHLA110000682019.**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.६ ने विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादीला महत्त्वाची कागदपत्रं मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे मुदतीत न्यायालयात हजर राहुन कैफियत दाखल करता आलेली नाही. तसेच दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामुळे सदर प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास परवानगी न दिल्यास प्रतिवादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्याची सदर प्रतिवादीने मागणी केली आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व कायदेशीर नाही. सदर प्रतिवादीने जाणिवपूर्वक मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे अर्ज चालु शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची वादीने मागणी केलेली आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदर प्रतिवादीला कैफियत दाखल करण्याकरिता पुरेशी संधी देऊन देखील प्रतिवादीने मुदतीमध्ये कैफियत दाखल केलेली नाही. तसेच सदर

अर्जातील कथनाच्या पृष्ठर्थ सदर प्रतिवादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे निराकरण गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर प्रतिवादी क्र.६ ला देखील बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचीत होणार आहे. तसेच सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्ज प्रतिवादी क्र.६ वर खर्च बसवून मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. नि.क्र.२२ वरील अर्ज प्रतिवादी क्र.६ वर रक्कम रु.१०००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.६ ने वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.01.21 15:48:13 +0530

दि.२१.०१.२०२०. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.